# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
## विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

**डॉ. सविता कुलकर्णी**
**संचालक (अतिरिक्त कार्यभार)**


संदर्भ: विविमं/२०२५–२६/७१३ दिनांक : १६ मार्च, २०२६

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित **पुणे जिल्ह्यातील**
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

विषय : विद्यार्थी विकास मंडळ अंतर्गत लेखा परीक्षण पूर्वनियोजन कार्यशाळेबाबत.

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळातंर्गत ज्या विविध योजना व शैक्षणिक उपक्रम आपल्या महाविद्यालयात/मान्यताप्राप्त परिसंस्थेत शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये राबविण्यात आलेल्या आहेत, त्यासंदर्भातील सर्व लेखे यावर्षी केंद्रिय पद्धतीने स्विकारण्यात येणार असून सदर केंद्रीय लेखा परीक्षणाचे वेळी येणाऱ्या शंकाचे निरसन तसेच यासंदर्भातील ऑनलाईन अर्ज भरण्याबाबत मार्गदर्शन करण्याकरिता 'केंद्रिय लेखा परीक्षण पूर्वनियोजन' कार्यशाळेचे आयोजन **शुक्रवार, दिनांक २० मार्च २०२६ रोजी पर्यावरणशास्त्र विभाग सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे** येथे पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

| जिल्हा/विभाग | नाव नोंदणी व अल्पोपहार | कार्यशाळा वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| पुणे, पिंपरी–चिंचवड शहर व पुणे ग्रामीण विभाग | सकाळी १०.०० ते सकाळी १०.३० | सकाळी १०.३० ते दुपारी ०१.०० | पर्यावरणशास्त्र विभाग सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे |
| भोजन दुपारी ०१.०० ते १.३० | | | सेवक विहार सभागृह सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे |

तरी सदर कार्यशाळेकरिता शुक्रवार, दिनांक २० मार्च २०२६ रोजी पर्यावरणशास्त्र विभाग सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे आपल्या महाविद्यालयातील/परिसंस्थेतील विद्यार्थी कल्याण अधिकारी यांना वरीलप्रमाणे समक्ष उपस्थित राहण्याबाबत सूचित करावे. कळावे, ही विनंती.

(डॉ. सविता कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ